# राशिभविष्य - ऑगस्ट, २०१८.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

===========================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळींचा वर्तमान स्वभाव अत्यंत अस्थिर, चंचल व लहरी असा घडला असावा, असे वाटते. त्यामुळे कोणी काही समजुतीच्या चार गोष्टी सांगितल्या तर तो अपमान समजून संतप्त होत असाल, असेही दिसते. या राशीची लहान मुले तर अत्यंत हूड, व्रात्य, खोडकर अशी झाली असावीत, असेही वाटते. हे सर्व हर्षलमुळे घडत असावे. पण हाच हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होणार आहे. रवि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्याने कौटुंबिक त्रास, अनारोग्य, नियोजित कार्यात दिरंगाई होणे, आर्थिक समस्या त्रस्त करणे, नोकरीत वरिष्ठांचा त्रास होणे, प्रिय जनांचे दूरत्व होणे अशापैकी मनस्तापदायक घटना घडणे संभवते. पण बुधामुळे गृहसौख्य व मित्रसुख मिळू शकेल . रवि-बुधासह असलेला राहूही अनिष्ट असून तो कौटुंबिक त्रास, कटकटी निर्माण करील. जपा. पण रवि ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी गेल्यावर काही प्रमाणात संततिसुख लाभेल. या राशीच्या दशम स्थानी असलेला केतू सुचवतो की या राशीच्या मंडळींचे वर्तमान आचरण " वरून कीर्तन, आतून तमाशा" अशा प्रकारचे ढोंगी होणे संभवते. नोकरी-व्यापार-व्यवसाय काहीही असो, त्यात खळबळजनक घटना घडतील. नोकरीत कामाचा ताण व वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेल. या राशीच्या युवकांना तर हातचे सोडून नवीन काही करावेसे वाटेल. पण त्यांनी तसे करू नये. आहे तीच नोकरी वा व्यवसाय नेकीने करावा. कुमार्गी मित्रांपासून सावध राहा. काहींना दूरच्या प्रवासाचे योग संभवतात. या राशीच्या काही मंडळींना योग्यता असूनही कर्तृत्व सिद्ध करण्यास संधीच मिळत नसल्याने नैराश्य येणे संभवते. अशा परिस्थितीत काहीना तर नको ती व्यसने लागणे संभवते. जपा. गुरु ग्रह अनुकुल असून प्रेमसंबंध असतील तर ते दृढ होतील, विवाहेच्छूना विवाहयोग येईल. काहींना नवे मित्र मिळतील. मन:शांतीसाठी श्रीगणेश उपासना करा,

**(२) वृषभ -** या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. महिन्याचा उत्तरर्ध प्रतिकुल असणार आहे. म्हणून त्यांनी महिन्याच्या पूर्वार्धातच जे काय साध्य करावयाचे ते साधून घेण्याचा अटोकाट प्रयत्न करावा. पण हितशत्रूपासून मनस्ताप होणे संभवते. जपा. राहूमुळे बंधुसुखात बाधा येणे संभवते. जपा. सर्व प्रकारच्या कलाक्षेत्रातील मंडळीना व विद्यार्थ्यांना कलाविष्कारास काळ अनुकुल होईल व कलानंद अनुभवता येईल. बौद्धिक, शैक्षणिक

कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. अष्टम स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे अनारोग्य, अपेक्षाभंग, असमाधानकारक घटना घडणे संभवते. शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात त्रास, मानहानी होणे संभवते. काहींना त्वचारोगाचा आजार त्रस्त करील, तर काहींना मुख- दंत- विकार वा रक्तविकार त्रस्त करतील. मानसोपचार तज्ञ , द्रव पदार्थ व्यापारी यांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. इतर व्यावसायिकांच्या व्यवसायात अस्थिर परिस्थिती निर्माण होणे संभवते. गुरु-नेपच्यून शुभ योगामुळे अध्यात्माची ओढ असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधणे व मन:शांती मिळवणे शक्य होईल. व्यय स्थानी असलेला हर्षल पूर्णपणे प्रतिकुल असून तो वाईट, जिवावरचे प्रसंग निर्माण करण्याची शक्यता आहे. तसेच अकारण शत्रुत्व निर्माण करण्याची शक्यता दिसते. जपा. श्रद्धा असेल तर मन:शक्ती व मन:शांतीसाठी शिवोपासना व श्रीहनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे " शिवलीलामृत " स्तोत्राचे व "श्रीहनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(३) मिथुन -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा उत्तरार्धच सर्व प्रकारे अनुकुल, सुखकारक व लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात आर्थिक समस्या त्रस्त करतील. वादविवाद, भांडणे, वित्तहानी होणे संभवते. मनस्थिती अस्वस्थ, चंचल राहील. काहींना कुसंगतीची बाधा होणे संभवते. शिवाय मित्र शत्रू होण्याचीही शक्यता दिसते. राहूमुळे कौटुंबिक जीवनातील सुखात विविध कारणांनी बाधा येणें संभवते. शारीरिक उष्णता भडकून काही मंडळीना डोळ्याची दुखणी त्रस्त करतील. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल.

शेतीवाडी असणारांना त्यापासून लाभ मिळेल. काही युवकयुवतींना विवाहयोग संभवतो. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे काहींचे प्रेमसंबंध घट्ट होतील; तर काहींना नवे मित्र मिळतील. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे सहज शक्य होईल. ज्या स्त्रियांचा या महिन्यात प्रसूतिकाळ आहे त्यांना पुत्रप्राप्ती होणे संभवते. पण राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या मंगळ-केतुमुळे या राशीच्या मंडळींच्या वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येण्याची दाट शक्यता आहे. तसेच शारीरिक उष्णता भडकून उष्णता विकाराचे आजार त्रस्त करतील. काहींना नेत्रविकार त्रस्त करतील तर काहींना मूळव्याधीसारख्या आजाराचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. तसेच काहींना रक्तविकार त्रस्त करतील तर काहींना त्वचारोगाचा आजार त्रस्त करील. त्याशिवाय कौटुंबिक जीवनात वादविवाद, भांडणे होतील. जपा. अपघात भय असल्याने सतत सावधानतेने आचरण करा, विषभय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. जलभय असल्याने जलप्रवास करू नका. हर्षलमुळे

मित्रांशी भांडणे होणे संभवते. पण हा हर्षल आर्थिक लाभही देऊ शकेल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

(४) **कर्क -** या राशीच्य मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ शारीरिक-मानसिक आरोग्याच्या दृष्टीने प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. रक्तदाब , हृदयविकार , नेत्रविकार, वातविकार असे आजार असणारांनी मनस्थिती शांत ठेवण्याचा प्रयत्न करावा. काही मंडळींना गलितगात्र करणारा थकवा येईल. मानसिक चिंता त्रस्त करतील. अशा परिस्थितीत आर्थिक नुकसान होणे, मित्रांशी वितुष्ट येणे, कुसंगतीची बाधा होणे अशा घटना घडतात, जपा. पण मनस्थिती शांत राखता आली व सहनशीलतेचे आचरण करणे जमले तर शुभ ग्रहांच्या अनुकुलतेचा आनंद घेऊ शकाल. वकिली, सल्लागारी व्यवसाय असणारांना तसेच चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना , शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. अन्य प्रकारच्या व्यावसायिकांना सुद्धा काळ लाभदायक होईल. सप्तम स्थानी असलेल्या मंगळ व केतूमुळे वैवाहिक जीवनात जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे, दोघांतील वाद, भांडणे, गैरसमज अशापैकी कारणानी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी काहीही कारणाने भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. जलभय असल्याने जलप्रवास करू नका. पाण्यात पोहोताना काळजी घ्या. तसेच विषभय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे कौटूंबिक सुखसमाधान लाभेल. काहींचे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार अपेक्षेनुसार घडून येतील. काहींना धनलाभ होणेही संभवते. पण नातेवाईक मंडळीपैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

(५) **सिंह -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात स्वत:च्या शारीरिक-मानसिक अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. सतत मनाविरुद्ध घडत जाणाऱ्या घटनांमुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. त्यामुळे गहरे नैराश्य येणे संभवते. काही मंडळींना गलितगात्र असा थकवा येणे संभवते. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी सतत सहनशील बनून व मनावर आणि विचारशक्तीवर नियंत्रण ठेवून आचरण करणेच सुखाचे होईल. काही मंडळींना भावंडाकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. मंगळ ग्रहामुळे शारीरिक उष्णता भडकून

उष्णताविकाराचे आजार त्रस्त करतील. इजा होणे, अंगावर फोड येणे, ताप येणे, अशापैकी आजार होणे संभवते. काही मंडळीना नव्याने रक्तविकार, हृदयविकार होणे संभवते, जपा. घरात चोरी होण्याची शक्यता आहे. जपा. काही मंडळींना अपप्रचाराचा त्रास सहन करावा लागेल. तसेच मानहानी होणेही संभवते. व्ययस्थानी असलेल्या बुध ग्रहामुळे हाती घेतलेल्या कार्यात अपयश येणे संभवते. पण केतूमुळे शारीरिक अनारोग्य नियंत्रणात राहील. राहू व नेपच्यूनमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. व्ययस्थानी असलेला राहू हितशत्रूपासून रक्षण करील. अशा प्रतिकुल परिस्थितीत गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. शुक्रामुळे कौटुंबिक सुख लाभेल, धनलाभ होणेही संभवते. स्त्रीसुख लाभेल. गुरु ग्रहामुळे या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपात प्रकाशित होईल. बौद्धिक व संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना काळ प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. प्रवासाचे योग येतील. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना अनुकुल होईल व
दिलासा मिळेल.

**(६) कन्या -** या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होणार आहे. त्यामुळे जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करा. लाभस्थानी असलेल्या बुध ग्रहामुळे नवे मित्र मिळतील. धनलाभही होईल व सुखसमाधान लाभेल. शासकीय, निम-शासकीय नोकरीतील अधिकाराचे पद असणारांनी वाम मार्ग धन मिळविण्याचा विचारही करू नये. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे , अडचणी येणे संभवते. तसेच अनारोग्यामुळेही प्रगतीत अडथळे येणे शक्य आहे. पण यांत्रिक तांत्रिक नोकरी-व्यवसाय , वैद्यकीय व्यवसाय, औषध विक्रेते यांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. तुळा या शुक्राच्या बौद्धिक राशीत गुरु ग्रह असल्याने बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल. शुक्रामुळे वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे मातेस आजार होणे, विविध कारणांनी गृहसौख्यात बाधा येणे, त्यामुळे मनस्ताप होणे संभवते. तसेच पंचम स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. काही मुलांचे अयोग्य आचरण, काहींचे अभ्यासात लक्ष नसणे, काहींच्या अनारोग्यामुळे अशी बाधा येणे संभवते. या राशीच्या काही मंडळीना उगीचच काही आजार झाल्याची भावना त्रस्त करील. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे अपघात भय आहे. त्यामुळे सतत सावधानतेने आचरण

करा. वाहन चालविताना मोबाईलवर बोलू नका. तसेच वाहन नियंत्रित वेगाने चालवा. श्रद्‌धा असेल तर कुलदैवताची उपासना करा.

**(७) तुळा -** या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. इच्छा आकांक्षा पूर्ण होतील. हाती घेतलेली जबाबदारी यशस्वीपणे पार पडेल. त्यामुळे प्रतिष्ठा वाढेल. काही मोठ्या अधिकारी मंडळींच्या ओळखी होतील. स्वतंत्र व्यवसाय असणारांना व्यवसायात वाढ करणे शक्य होईल. महिन्याच्या उत्तरार्धात काही मंडळीना बढती, मानाचे स्थान असे काही मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे शारीरिक मानसिक आरोग्य उत्तम राहील. कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. राहू ग्रह सुद्‌धा नोकरदार मंडळीना अनुकुल आहे. शनि ग्रहामुळे काही मंडळीना उत्तम नोकरी किंवा एखादे आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करील. कौटुंबिक जीवनात घरातील कोणाशी पटणार नाही. त्यामुळे वाद, भांडणे होणे संभवते. त्यात केतुसह असणारा मंगळ भर घालील व गृह्सौख्यात बाधा निर्माण होईल. जपा. कुटुंबात असमाधानकारक घटना घडण्याची शक्यता आहे. सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अतिशय भावनाशील झाली असेल तर त्यांनी मन:शक्तीसाठी आध्यात्मिक उपासना करावी, आध्यात्मिक उन्नतीसाठी वर्तमान काळ अतिशय अनुकुल आहे. गूढ संशोधनात रुची असणारांना काळ अनुकुल होईल. या राशीच्या सप्तम स्थानी मंगळाच्या राशीत असलेला हर्षल ग्रह वैवाहिक जीवनात त्रास, अडचणी , बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. त्यामुळे अपेक्षित वैवाहिक जीवनातील सुख मिळण्याची शक्यता दिसत नाही. जीवनसाथीचे विक्षिप्त, लहरी आचरण, दोघांतील वाद, गैरसमज अशापैकी कारणांनी सुखसमाधान मिळणे अशक्य होईल. जपा. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी संशय , मतभेद अशापैकी कारणानी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. श्रद्‌धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे “ओम नम: शिवाय “ मंत्राचा एक माळ जप करा.

**(८) वृश्चिक -** शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ आता केवळ दीड वर्षाचा उरला आहे. दिनांक २४ जानेवारी, २०२० या दिवशी या राशीची मंडळी साडेसातीच्या प्रतिकुल काळातून मुक्त होणार आहेत. तोपर्यंत होणारा मनस्ताप सुसह्य व्हावा यासाठी आध्यात्मिक उपासनेत काळ व्यतीत करा. आपल्या संतापी , अहंकारी स्वभावावर नियंत्रण ठेवा. सहनशील व्हा. नम्रतेचे आचरण करा. तरच प्रतिकुलतेशी मुकाबला करण्यास मन:शक्ती प्राप्त होईल. या महिन्याच्या काळात कौटुंबिक जीवनात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता आहे. त्यात भर म्हणून आर्थिक समस्या त्रस्त

करतीलसे वाटते. कर्ज असेल तर त्यासंबंधी चिंता अस्वस्थ करील. कोर्ट प्रकरणे असतील तर काय होईल हे सांगायची जरूर नाही. अशा परिस्थितीत जिद्दी मंगळ धैर्याने मुकाबला करण्याची हिंमत देईल. महत्त्वाकांक्षा उफाळून येईल. पण या वृत्तीला लगाम घाला आणि शांत राहा. घरगुती परिस्थितीत गैरसमज, वाद आदी कारणांनी असह्य मनस्ताप होईल. जपा. या राशीच्या विद्यार्थ्यांनी आपले आरोग्य उत्तम राखले तरच त्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला हर्षल ग्रह उच्च शास्त्रीय संशोधन क्षेत्रास अनुकुल असला तरी तो अनारोग्यकारकच आहे. त्यामुळे अति विचार करू नका. मेंदूला आवश्यक ती विश्रांती द्या. नपेक्षा काहींना वैचारिक ताणामुळे डोकेदुखीचा तर काहींना मेंदूविकाराच आजार होणे संभवते. जपा. या राशीच्या सर्व नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण त्यासाठी सर्वांगीण आरोग्य उत्तम राखता आले पाहिजे. बुध-राहूमुळे नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होतील. पण शुक्र ग्रहामुळे सतत मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे एक माळ “ओम गं गणपतये नम:” मंत्राचा जप करा. तसेच “श्रीहनुमान चालीसा स्तोत्रा"चे पठण करा.

**(९) धनु -** सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अत्यंत भावनाशील झाली असण्याची शक्यता वाटते. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी गहरे नैराश्य येत असावे असे वाटते. या राशीच्या मंडळींना शनि ग्रहाची साडेसाती चालू आहे ही बाब सतत ध्यानात ठेवूनच मनस्थिती स्वस्थ, शांत राखण्याचा प्रयत्न करा. सहनशीलता अंगी बाणवा. जिभेला लगाम घाला. सतत नम्रतेचे आचरण करा. त्यामुळेच काही प्रमाणात काळाची अनुकुलता लाभेल व काही प्रमाणात अपेक्षित तेच घडेल. या महिन्याच्या काळात स्वत:च्या व जीवनसाथीच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करील. नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होतील. कुटुंबातील प्रिय जनांपैकी कोणाचे स्थलांतर झाल्यास अस्वस्थ व्हाल. धनस्थानी असलेल्या मंगळ-केतू या ग्रहांमुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील. देणे द्यावेच लागेल; पण येणे कधी येईल ते सांगता येणार नाही. अशामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकाराचे अनारोग्य होणे संभवते. घसा, मान, दाढा, डोळे यांचे अनारोग्य होणे संभवते. तृतीय स्थानी असलेला नेपच्यून आध्यात्मिक उपासनेस अनुकुल असून उपासनेद्वारे मन:शक्ती प्राप्त होऊ शकेल . या राशीच्या पंचम स्थानी असलेला हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यास अनुकुल होईल. तसेच कला क्षेत्रांतील मंडळीना सुद्धा अनुकुल व प्रगतिकारक

असणार आहे. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचा अनुभव येईल. व्यापार-व्यवसाय असणाऱ्या मंडळींच्या व्यवसायात

अडचणी निर्माण होतील. लाभस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे मनोनुकुल घटना घडतील, या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करता येईल. विवाहेच्छूना विवाहयोग संभवतो. इच्छा आकांक्षा काही प्रमाणात पूर्ण होतील. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती प्राप्त होईल. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळींनी आपल्या हट्टी, संतापी, मानापमान फार असणाऱ्या स्वभावावर नियंत्रण ठेवून व सहनशील बनून आचरण केले तर होणारा मनस्ताप सुसह्य

होईल व अकारण करावे लागणारे शारीरिक श्रम व दगदग होणार नाही. त्यामुळे शारीरिक आरोग्यही फारसे बिघडणार नाही. मन सुखासक्त झाले आहे; पण परिस्थिती सुख लाभू देत नाही, अशा द्विधा मनस्थितीशी मुकाबला करण्यासाठी असेच आचरण करून व शक्यतो मौन व्रत धारण करून प्रतिकुल काळ व्यतीत करणेच सुखाचे होईल. शिवाय सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अत्यंत हळवी झाली असण्याची शक्यता जाणवते. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच गहरे नैराश्य येत असावे ,असे वाटते. अस्वस्थ मनस्थितीत आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही. कोणाशी पटणार नाही, सतत तक्रारी कराल तर कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभणेही अशक्य होईल. या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. पण महिन्याचा पूर्वार्ध त्यातल्यात्यात

बरा जाईल. या काळात पोटाचे अनारोग्य होणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात रोग प्रतिकारशक्ती कमी झाल्यास अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल. राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा येणे संभवते. जपा. पण बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणाराना मात्र गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे नियोजित कार्यात प्रगती करणे, यश मिळविणे शक्य होईल. वरिष्ठ अधिकारी कौतुक करतील. काहींचा मानसन्मान होणेही संभवते. आर्थिक व्यवहार मात्र विचारपूर्वकच करा. नपेक्षा आर्थिक नुकसान होणे संभवते. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ आहे ही गोष्ट सतत ध्यानात ठेवून आचरण करा. श्रद्धा असेल तर मन:शांतीसाठी श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे " ओम गं

गणपतये नम: “ मंत्राचा एक माळ जप करा. तसेच “हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अतिशय कोमल झाली असावी, असे वाटते. तसे असेल तर मानसिक संवेदनाही अति शीघ्र होत असतील. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तर लगेच गहरे नैराश्य येत असले पाहिजे. मन:शक्ती वाढण्यासाठी आध्यात्मिक उपासना करा. या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल होणार असून तुलनात्मक दृष्ट्या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. त्यामुळे या महिन्यात नोकरीत जे काय साध्य व्हावे असे वाटते ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा अटोकाट प्रयत्न करा. उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. या राशीच्या काही भाग्यवान मंडळीना परदेशगमनाची संधी मिळणेही संभवते. बुध ग्रहाच्या अनुकुलतेमुळे काहींना कीर्ती, प्रसिद्धी मिळणेही संभवते. राहूमुळे ज्यांचा परजातीय,परधर्मीय मंडळींशी व्यावसायिक संबंध आहे त्यांना अशा संबंधामुळे अधिक धनलाभ होणे संभवते. काही मंडळीना पोटविकाराचा आजार त्रस्त करीलसे दिसते. गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे जन्मजात गुणांचा विकास होईल, प्रवासाचे योग येतील, अध्यात्मात प्रगती होईल, कमी श्रमात धन, अचानक धनलाभ किंवा वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. पण लाभस्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे काहीही कारणाने संततिसुखात बाधा येणे संभवते. वैवाहिक जीवनातील सुखशांती लाभेल; पण सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखले गेले पाहिजे. मंगळ ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. श्रद्धा असेल तर श्रीहनुमान व श्रीशिवोपासना अनुकुल होईल, मन:शक्ती प्राप्त होईल आणि सर्व सुखाचेच होईल. दररोज नियमितपणे “ ओम नम: शिवाय" या मंत्राचा एक माळ जप करा. तसेच “हनुमानचालिसा “ स्तोत्राचे पठण करा.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळींचे वर्तमान आचरण अस्थिर, अविचारी, विचित्र असे होत असावे, असे वाटते. समोरच्याशी बोलणेही अति धारदार, फटकळ होत असावे, असे वाटते. त्याशिवाय अविचाराने खर्च होत असणेही संभवते. आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचा अपमान होत आहे याची जाणीवही होत नसेल. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल, यशदायक व लाभदायक होईल. हितशत्रू पराभूत होतील. पण महिन्याच्या पूर्वार्धात स्वत:चे अनारोग्य , संततिविषयक समस्या, नोकरीत वरिष्ठ अधिकाऱ्याचा त्रास, नातेवाईक मंडळीपासून फारकत

अशापैकी घटना मनस्ताप देतील, असे वाटते. राहूमुळे कमिशन, दलाली व्यवसाय असणारांना अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होईल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. सप्तम स्थानी असलेल्या शुक्र ग्रहामुळे वैवाहिक जीवनातील सुख मिळेल; प्रेमिकांचे विवाह होतील, जीवनसाथी कलाकार असेल तर कलाविश्वात रममाण व्हाल. जन्मकुंडलीत योग असेल तर या राशीच्या काही मंडळीना अचानक धनलाभ किंवा वारसा हक्काने धनलाभ मिळू शकेल. चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय, वकिली सल्लागारी व्यवसाय असणारांना, लोखंड, कोळसा व्यापार असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या काही मंडळीना कष्ट, परिश्रम करूनच अपेक्षित अर्थप्राप्ती मिळू शकेल. पण काही भाग्यवान मंडळींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही संभवते. व्ययस्थानी असलेला नेपच्यून गुप्त पोलीस कर्मचारी असणारांना व द्रव पदार्थांचा व्यापार असणारांना प्रगतिकारक व लाभदायक होईल. आपली राशी श्रीगुरुदेव दत्तात्रेयांची राशी असल्याने श्रीगुरुदेव दत्तात्रेयांची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

=====ooooo0ooooo=====